**ठळक बातम्या**

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी महायुतीच्या जागावाटपाचं चित्र येत्या दोन दिवसांत स्पष्ट होईल, असा मुख्यमंत्र्यांना विश्वास

- राज्यातल्या शाळा आणि महाविद्यालयांना शालेय सहलीसाठी एसटीच्या नवीन बस मिळणार

- बिहारमधे सरकारस्थापनेच्या हालचालींना वेग

- छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार

**आणि**

- कोलकाता कसोटी क्रिकेट सामन्यात भारताचा दक्षिण आफ्रिकेकडून ३० धावांनी पराभव

**<><><><><>**

राज्यातल्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी महायुतीच्या जागावाटपाचं चित्र येत्या दोन दिवसांत स्पष्ट होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.छत्रपती संभाजीनगर इथं ते वार्ताहरांशी बोलत होते. या निवडणुकांच्या जागावाटपाचे निर्णय जिल्हास्तरावर होतात, त्यामुळे काही ठिकाणी महायुती झाली आहे, काही ठिकाणी दोन पक्ष एकत्र आले आहेत, तर काही ठिकाणी कोणत्याही पक्षांमध्ये युती झालेली नाही. यावर चर्चा सुरू आहे, असंही ते म्हणाले. महानगरपालिकांच्या निवडणुकीत मात्र शक्य तिथं युती होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांचा पूर्णाकृती पुतळा आणि परिसर सुशोभीकरणाच्या कामाचं लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी महाराष्ट्राच्या जडणघडणीत वसंतरावांचं योगदान अधोरेखित करताना ते म्हणाले,

***होल्ड... बाईट- देवेंद्र फडणवीस***

त्यानंतर क्रांतीचौक इथं स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पुतळ्याचं लोकार्पण आणि कमल तलाव पुनरुज्जीवनाच्या कामाचं लोकार्पणही फडणवीस यांनी केलं. त्याआधी मुख्यमंत्र्यांनी चिकलठाणा इथं भाजपच्या निवडणूक कार्यालयाचं उद्घाटन केलं.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज सातारा परिसरातल्या श्रीयश आयुर्वेदिक महाविद्यालय आणि रुग्णालय तसंच संशधोन केंद्राच्या नव्या इमारतीचं उद्घाटन होणार आहे.

**<><><><>**

नंदुरबार जिल्ह्यामधल्या नंदुरबार, नवापूर, शहादा आणि तळोदा या नगरपरिषदांच्या नगराध्यक्षपदासाठी १४ उमेदवारी अर्ज दाखल झाले असून नगरसेवक पदासाठी १४६ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. नंदुरबार ४१, शहादा २९, तळोदा २१ आणि नवापूर नगरपरिषदेच्या २३ जागांसाठी निवडणूक होणार आहे. राज्यातल्या नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी दोन डिसेंबरला मतदान होणार आहे.

**<><><><>**

राज्यातल्या शाळा आणि महाविद्यालयांना शालेय सहलीसाठी राज्य परिवहन महामंडळ अर्थात एसटीच्या नवीन बस उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. राज्याचे परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली. शिक्षण संस्था आणि विद्यार्थ्यांना स्वस्त आणि सुरक्षित प्रवासाचा आनंद घेता यावा हा यामागचा उद्देश असल्याचं त्यांनी सांगितलं. याअंतर्गत एसटीच्या राज्यभरातल्या दोशने एक्कावन्न आगारांमधून दररोज आठशे ते हजार बस उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

सहलींसाठी शाळा महाविद्यालयांना सवलीत बस उपलब्ध करून दिल्यानं, महामंडळाला मागच्यावर्षी ९२ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला होता. त्याअनुषंगानंच यावर्षी देखील या शाळा महाविद्यालयांनी या सेवेचा लाभ घ्यावा यासाठी आगारप्रमुख, स्थानकप्रमुख स्वतः शाळा - महाविद्यालयांच्या मुख्याध्यापक आणि प्राचार्यांना भेटून विविध धार्मिक ऐतिहासिक पर्यटन स्थळांच्या सहलीचं आयोजन करण्यासाठी आवाहन कर असल्याची माहितीही त्यांनी दिली.

**<><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या प्रचंड विजयानंतर राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं राज्यात सरकार स्थापन करण्यावर लक्ष केंद्रित केलं आहे. सरकार स्थापनेसाठी राजकीय हालचालींनी वेग घेतला आहे. या घडामोडींबद्दल अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून :

**- - VC - -**

(*बिहार विधानसभा निवडणुकांमधल्या दणदणीत विजयानंतर केंद्रीय मंत्री आणि लोक जनशक्ती पार्टी (राम विलास) चे अध्यक्ष चिराग पासवान, हिंदुस्थानी अवाम मोर्चाचे अध्यक्ष संतोष सुमन यांच्यासह एनडीएच्या घटक पक्षांच्या नेत्यांनी सत्ता स्थापनेबाबत चर्चा करण्यासाठी काल पाटणा इथं जदयू चे अध्यक्ष आणि मुख्यमंत्री नितीश कुमार यांची भेट घेतली. जदयू चे कार्यकारी अध्यक्ष संजय झा आणि केंद्रीय मंत्री राजीव रंजन सिंह यांनीही काल संध्याकाळी नवी दिल्लीत भाजपाचे ज्येष्ठ नेते, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या बैठकीत नवीन सरकार स्थापनेबाबत प्राथमिक चर्चा झाल्याचं वृत्त आहे.*

*तर दुसरीकडे, जदयूनं आपल्या सर्व ८५ नवनियुक्त आमदारांना पाटणा इथं बोलावून घेतलं आहे. उद्या, जदयू विधिमंडळ पक्षाची बैठक होणार असून, यावेळी पक्षाचे अध्यक्ष नितीश कुमार यांची विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड केली जाईल.*

*एनडीएचे पाचही घटक पक्ष आपापल्या विधिमंडळ पक्षाच्या नेत्यांची निवड करण्यासाठी स्वतंत्र बैठका घेतील, त्यानंतर एक संयुक्त बैठक आयोजित केली जाईल, यावेळी एनडीएच्या नेत्याची निवड केली जाईल.*)

बिहारमध्ये उद्या राज्य मंत्रिमंडळाची शेवटची बैठक होण्याची शक्यता असून, यावेळी मंत्रिमंडळ बरखास्त करण्याची शिफारस केली जाईल.

दरम्यान, निवडणुकीतल्या दारुण पराभवानंतर राजदमधले पक्षांतर्गत मतभेद आणखी तीव्र झाले आहेत. माजी मुख्यमंत्री, लालू प्रसाद यादव यांच्या कन्या आणि पक्षाच्या नेत्या रोहिणी आचार्य यांनी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला आहे. कुटुंबीयांबरोबरचेही संबंध तोडत असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावर जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात आज सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार झाले. यात दोन महिला नक्षलवाद्यांचा समावेश आहे. या तिघांवर १५ लाख रुपयांचं बक्षीस होतं. आत्तापर्यंत तीन मृतदेह सापडले आहेत, तसंच एक रायफल, बीजीएल लॉन्चर्स, इतर शस्त्रास्त्रं आणि स्फोटकं जप्त केली आहेत. तुमालपाड भागातल्या जंगलात नक्षलवाद्यांचा वावर असल्याची खबर मिळाल्यानंतर जिल्हा राखीव दलाच्या एका पथकानं

या भागात शोधमोहीम सुरू केली. सुरक्षा दलं आणि नक्षलवाद्यांमध्ये आज सकाळपासून चकमक सुरु होती. सध्या या भागात शोधमोहीम सुरू आहे.

<><><><><>

दिल्लीत लाल किल्ला मेट्रो स्थानकाजवळ १० नोव्हेंबर रोजी झालेल्या स्फोटाचे धागेदोरे मिळवण्याचं काम तपास यंत्रणा करत आहेत. देशभरातल्या विविध ठिकाणी अद्याप शोधमोहिमा आणि तपासण्या सुरू आहेत. दिल्ली गुन्हे शाखेनं आज अल फलाह विद्यापीठाविरोधात फसवणूक आणि बनावट कागदपत्रं तयार केल्याप्रकरणी दोन एफआयआर दाखल केले आहेत. दरम्यान, लाल किल्ला मेट्रो स्टेशन प्रवाशांसाठी पुन्हा खुलं झालं आहे.

<><><><><>

जम्मू-काश्मीरच्या राजौरी या सीमावर्ती जिल्ह्यातून सुरक्षा दलांनी काल I.E.D, म्हणजेच ‘सुधारित विस्फोटक उपकरण’ जप्त केलं. या उपकरणाचा नियंत्रित स्फोट करून ते निकामी करण्यात आलं. या स्फोटामुळे थाना मंडी भागातल्या अप्पर बंगई गावातल्या एका घराचं नुकसान झाल्याचं आमच्या वार्ताहरानं सांगितलं.

<><><><><>

राष्ट्रीय पत्रकारिता दिन आज साजरा होत आहे. प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाची स्थापना या दिवशी १९६६मधे झाली होती. वर्तमानपत्रं आणि प्रसारमाध्यमांवर नैतिकदृष्ट्या देखरेख ठेवण्याचं काम ही संस्था करते. पत्रकारितेची स्वतंत्रता आणि जबाबदारी यांचं ते प्रतीक मानलं जातं. पत्रकारितेतल्या उत्कृष्ट कामगिरीसाठीचे राष्ट्रीय पुरस्कार या दिवशी प्रदान करण्यात येतात.

नवी दिल्ली इथं राष्ट्रीय पत्रकारिता दिनानिमित्त आयोजित समारंभाला माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव आणि माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल मुरुगन, उपस्थित राहिले. पीसीआय च्या अध्यक्ष न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई यावेळी उपस्थित होत्या. लोकशाहीमध्ये पत्रकारितेची भूमिका महत्त्वाची असल्याचं अश्विनी वैष्णव यावेळी म्हणाले.

आजच्याच दिवशी प्रेस कौन्सिल ऑफ इंडियानं पत्रकारितेमध्ये जागल्याची भूमिका घेतली, आणि पत्रकारितेचं स्वातंत्र्य जपणं, आणि भारतीय पत्रकारितेचा दर्जा उंचावणं अशी

दुहेरी जबाबदारी स्वीकारली, असं  रंजना प्रकाश देसाई यांनी सांगितलं. पत्रकारितेमध्ये प्रामाणिकपणा, चिकाटी आणि अचूक माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्याची  वचनबद्धता हवी, तसंच सत्याचा शोध घेण्याचं धैर्य हवं असं त्या म्हणाल्या.

<><><><><>

कोलकाता इथं झालेला पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं आज तिसऱ्याच दिवशी भारतावर ३० धावांनी विजय मिळवला, आणि दोन सामन्यांच्या या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

आज दक्षिण आफ्रिकेनं आपला दुसरा डाव कालच्या ७ बाद ९३ धावांवरून पुढे सुरू केला. आठव्या गड्यासाठी कर्णधार टेम्बा बवुमा आणि कॉर्बिन यांनी ४४ धावांची भागिदारी केली. मात्र बुमरानं कॉर्बिनला त्रिफळाचित करून ही जोडी फोडली. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेचा दुसरा डाव १५३ धावांत आटोपला. दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार बवुमा, ५५ धावांची झुंजार खेळी करुन  नाबाद राहिला. भारताचा रविंद्र जडेजा यानं सर्वाधिक चार, सिराज आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी २ तर बुमरा आणि अक्सर पटेल यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

भारतानं पहिल्या डावात ३० धावांची आघाडी घेतली होती. त्यामुळं भारताला दुसऱ्या डावात विजयासाठी १२४ धावांचं आव्हान मिळालं. मात्र विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना भारताचा दुसरा डाव गडगडला.

<><><><><>

मराठवाडा, विदर्भ, मध्यप्रदेश आणि छत्तीसगडच्या काही भागात उद्यापर्यंत थंडीची लाट राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//